# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

परिपत्रक : ३१२/२०२१

**Ph. D. Admission Process 2021**

**विषय : पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी मान्यताप्राप्त संशोधन केंद्र व मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळालेल्या संशोधक मार्गदर्शकाकडील रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्यासाठी अंतिम मुदतवाढीबाबत....**

सन २०२१ मध्ये करावयाच्या पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडून त्यांच्याकडे रिक्त जागांची माहिती विद्यापीठ परिपत्रक क्र. २०८/२०२१ दि. ११/०८/२०२१ अन्वये **http://bcud.unipune.ac.in/root/login.aspx** या लिंकव्दारे ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेली होती.

तथापि, मार्गदर्शक/संशोधन केंद्र यांना रिक्त जागांची माहिती अद्ययावत करण्यासाठी दिलेल्या अंतिम मुदतीनंतर नव्याने संशोधन केंद्राना मान्यता मिळाली आहे तसेच काही शिक्षकांना नव्याने मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळालेली आहे. सदर बाब विचारात घेता, यासंदर्भात पुन:श्च कळविण्यात येते की, मान्यताप्राप्त मार्गदर्शकांनी परिपत्रक क्र. ९७/२०२१ दि. ०१/०४/२०२१ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार Declare Ph.D. Vacancy 2021 या लिंकवर आपल्याकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती स्वत:च्या Teacher Login वरून ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाच्या **www.unipune.ac.in** या संकेतस्थळावरून **http://bcud.unipune.ac.in/root/login.aspx** या लिंकव्दारे **दि. १८/११/२०२१** पर्यंत आपल्या संशोधन केंद्रामार्फत अद्ययावत करावी. या मुदतीनंतर रिक्त जागा अद्ययावत करण्याबाबत कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही, यांची नोंद घ्यावी.

ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क :–

- ई–मेल आयडी :– phd.mphiladmis@pun.unipune.ac.in
- दुरध्वनी क्र. :– ०२० –२५६२१२२७
- **माहिती अद्ययावत करण्यासाठीची लिंक** :– http://bcud.unipune.ac.in/root/login.aspx

उपकुलसचिव,
**शैक्षणिक प्रवेश**

गणेशखिंड, पुणे – ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/४१४२
दिनांक : १२/११/२०२१

प्रत :–

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या संशोधन केंद्रातील मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून देऊन उपरोक्त दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.

Desktop/Ph. D. Admission 2020-21/Circular Ph. D. Vacant Seats - Final & Extension